शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता ८वी

विषय – मराठी (प्रथम भाषा)

घटक 3 – कार्यात्मक व्याकरण

भारांश – 44% प्रश्नसंख्या – 11 एकूण गुण 22

3.2 संधी

संधी म्हणजे सांधणे /जोडणे. शब्दातील एकमेकांशेजारी आलेल्या वर्णांच्या एकत्र येण्याला म्हणजेच जोडण्याला संधी म्हणतात.

संधींचे प्रकार –

1) **स्वरसंधी** – एकमेकांशेजारी येणारे वर्ण जर स्वर असतील, तर त्यांच्यातील संधीस स्वरसंधी म्हणतात.

नियम 1 – ऱ्हस्व किंवा दीर्घ स्वरापुढे तोच स्वर ऱ्हस्व किंवा दीर्घ आल्यास म्हणजेच दोन सजातीय स्वर लागोपाठ आल्यास त्याच जातीतील एकच स्वर दीर्घ येतो.

पोटशब्द	एकत्र येणारे स्वर व संधी	जोडशब्द
विद्या + अर्थी	आ + अ = आ	विद्यार्थी

नियम 2 – अ किंवा आ यांच्यापुढे इ किंवा ई आल्यास त्या दोहोंऐवजी 'ए' येतो.

अ किंवा आ यांच्यापुढे उ किंवा ऊ आल्यास त्या दोहोंऐवजी 'ओ' येतो.

अ किंवा आ यांच्यापुढे 'ऋ' आल्यास त्या दोहोंऐवजी 'अर्' येतो.

पोटशब्द	एकत्र येणारे स्वर व संधी	जोडशब्द
लोक + इच्छा	अ + इ = ए	लोकेच्छा
चंद्र + उदय	अ + उ = ओ	चंद्रोदय
महा + ऋषी	आ + ऋ = अर्	महर्षि

नियम 3 – अ किंवा आ यांच्यापुढे ए किंवा ऐ हे स्वर आल्यास त्या दोहोंबद्दल 'ऐ' येतो आणि ओ किंवा औ हे स्वर आल्यास त्या दोहोंबद्दल 'औ' हा स्वर येतो.

पोटशब्द	एकत्र येणारे स्वर व संधी	जोडशब्द
सदा + एव	आ + ए = ऐ	सदैव
काल + ओघ	अ + ओ = औ	कालौघ

नियम 4 – इ, उ, ऋ (ऱ्हस्व किंवा दीर्घ) यांच्यापुढे विजातीय स्वर आल्यास इ, ई बद्दल 'य्' ; उ, ऊ बद्दल 'व्' आणि 'ऋ' बद्दल 'र्' हा वर्ण येऊन त्यात पुढील स्वर मिसळतो व संधी होतो.

पोटशब्द	एकत्र येणारे स्वर व संधी	जोडशब्द
अति + अल्प	इ+अ= य् +अ = य	अत्यल्प
अभी + उदय	इ + उ = य्+उ = यु	अभ्युदय
सु + अल्प	उ + अ = व् + अ = व	स्वल्प
पितृ+ आज्ञा	ऋ + आ = र् + आ = रा	पित्राज्ञा

नियम 5 – ए, ऐ, ओ, औ या स्वरांपुढे कोणताही स्वर आला तर त्यांबद्दल अनुक्रमे अय्, आय्, अव्, आव् असे आदेश होऊन पुढील स्वर त्यात मिसळतो.

पोटशब्द	एकत्र येणारे स्वर व संधी	जोडशब्द
शे + अन	ए+अ= अय् +अ = अय	शयन
गै+ अन	ऐ + अ = आय् + अ= आय	गायन
श्रो + अन	ओ + अ = अव् + अ =अव	श्रवण
रौ + अन	औ +अ = आव् =अ = आव	रावण

2) व्यंजनसंधी – संधी होताना जवळजवळ येणाऱ्या दोन वर्णांपैकी दोन्ही वर्ण व्यंजने असतील किंवा पहिला वर्ण व्यंजन व दुसरा वर्ण स्वर असेल, तर त्याला 'व्यंजनसंधी' म्हणतात.

नियम 1 – पहिल्या पाच व्यंजन वर्गांपैकी अनुनासिकाशिवाय कोणत्याही व्यंजनापुढे कठोर व्यंजन आले असता त्या पहिल्या व्यंजनाच्या जागी त्याच्याच वर्गातील पहीले कठोर व्यंजन येऊन संधी होतो.

पोटशब्द	एकत्र येणारी व्यंजने व संधी	जोडशब्द
आपद + काल	द्+ क् = त् + क्	आपत्काल

नियम –2 पहिल्या पाच व्यंजन वर्गांतील कठोर व्यंजनापुढे अनुनासिकाखेरीज स्वर किंवा मृदू व्यंजन आल्यास पहिल्या व्यंजनाच्या जागी त्याच वर्गातील तिसरे व्यंजन येऊन संधी होतो.

पोटशब्द	एकत्र येणारी व्यंजने व संधी	जोडशब्द
जगत् + अंब	त् + अं = द् + अं =दं	जगदंब

नियम 3 - पहिल्या पाच वर्गांतील कोणत्याही व्यंजनापुढे अनुनासिक व्यंजन आल्यास पहिल्या व्यंजनाबद्दल त्याच्याच वर्गातील अनुनासिक व्यंजन येऊन संधी होतो.

पोटशब्द	एकत्र येणारी व्यंजने व संधी	जोडशब्द
तत् + मय	त् + म् = न् + म्	तन्मय

नियम 4 – 'त्' या व्यंजनापुढे –

- च् , छ् आल्यास 'त्' बद्दल 'च्' येतो.
- ज् झ् आल्यास 'त्' बद्दल 'ज्' येतो.

- ड् , ढ् आल्यास ‘त्’ बद्दल ‘ड्’ येतो.
- ल् आल्यास ‘त्’ बद्दल ‘ल्’ येतो.
- ‘श्’ आल्यास ‘त्’ बद्दल ‘च्’ येतो व ‘श्’ बद्दल ‘छ्’ येतो.

पोटशब्द	एकत्र येणारे स्वर व संधी	जोडशब्द
सत् + चित्त	त्+ च् = च् + च्	सच्चित
सत् + जन	त् + ज् = ज् + ज्	सज्जन
तत् + टीका	त् + ट् = ट् + ट्	तट्टीका
तत् + लीन	त् + ल् = ल्+ ल्	तल्लीन
सत् + शिष्य	त् + श् = च् + छ्	सच्छीष्य

नियम 5 – ‘म्’ पुढे स्वर आल्यास तो स्वर मागील ‘म्’ मध्ये मिसळून जातो. ‘म्’ पुढे व्यंजन आल्यास ‘म्’ बद्दल मागील अक्षरावर अनुस्वार येतो.

सम् + आलोचन = समालोचन   सम् + योग = संयोग

नियम 6 – ‘छ्’ पूर्वी ऱ्हस्व स्वर आला, तर त्या दोहोंमध्ये ‘च्’ हा वर्ण येतो.

शिर + छेद = शिरच्छेद

3) विसर्गसंधी – एकत्र येणाऱ्या वर्णांतील पहिला वर्ण विसर्ग व दुसरा वर्ण व्यंजन किंवा स्वर असेल, तेव्हा त्यास विसर्गसंधी असे म्हणतात.

नियम 1 – विसर्गाच्या मागे ‘अ’ हा स्वर असून पुढे मृदू व्यंजन आल्यास, विसर्गाचा ‘उ’ होतो व तो मागील ‘अ’ मध्ये मिसळून त्याचा ‘ओ’ होतो.

उदा. यश: + धन = श् + अ + विसर्ग + धन = श् + ओ + धन = यशोधन

नियम 2 - विसर्गाच्या मागे ‘अ’ किंवा ‘आ’ यांच्याखेरीज कोणताही स्वर असून पुढे मृदू वर्ण आल्यास विसर्गाचा ‘र्’ होऊन संधी होतो.

उदा. नि: + अंतर = (न्)+ इ + विसर्ग + अं = (नि) रं = निरंतर

वरील नियमाप्रमाणे विसर्गाचा ‘र्’ झाला आहे. पण अशा ‘र्’ च्या पुढे ‘र्’ वर्ण आल्यास पहिल्या ‘र्’ चा लोप होतो व त्यामागील ऱ्हस्व स्वर दीर्घ होतो.

उदा. नि + रस = नि + र् +रस = नीरस

नियम 3– पहिल्या पदाच्या शेवटी ‘स्’ येऊन त्याच्यापुढे कोणतेही कठोर व्यंजन आल्यास त्या ‘स्’ चा विसर्ग होतो.

उदा. मनस् + स्थिती = मनस्थिती

नियम 4 – पहिल्या पदाच्या शेवटी ‘र्’ येऊन त्याच्यापुढे कठोर व्यंजन आल्यास त्या ‘र्’ चा विसर्ग होतो.

उदा . चतुर् + सूत्री = चतु:सूत्री

नियम 5 – पहिल्या पदाच्या शेवटी विसर्गाच्या ऐवजी येणाऱ्या ‘र्’ च्या मागे ‘अ’ व पुढे मृदु वर्ण आल्यास तो ‘र्’ तसाच राहून संधिरूप तयार होते.

उदा. अंत: + आत्मा = अंतर् + आत्मा = अंतरात्मा

नियम 6 – पहिल्या पदाच्या शेवटी विसर्गाच्या मागे ‘अ’ हा स्वर असून पुढे क्, ख् , प् , फ् यापैकी एखादे व्यंजन आले, तर विसर्ग कायम राहतो; मात्र पुढे स्वर आला तर विसर्ग लोप पावतो.

उदा. प्रात: + काल = प्रात:काल

अत: + एव = अतएव

नियम 7 – पहिल्या पदाच्या शेवटी विसर्गाच्या मागे ‘इ’ किंवा ‘उ’ हा स्वर असून पुढे क्, ख् , प् , फ् यापैकी कोणताही वर्ण आल्यास विसर्गाचा ‘ष्’ होतो.

नि: + पाप = निष्पाप

नियम 8 – विसर्गाच्या पुढे च् , छ् आल्यास विसर्गाचा ‘श्’ होतो. आणि त्, थ् आल्यास विसर्गाचा ‘स्’ होतो.

उदा. नि: + तेज = निस्तेज

नियम 9 – विसर्गाच्या पुढे ‘श्’, ‘स्’ आल्यास विसर्ग विकल्पाने कायम राहतो किंवा लोप पावतो.

उदा. दु: + शासन = दु:शासन

नियम 10 – विसर्गाच्या पुढे ‘कृ’ या धातूचे रूप आल्यास विसर्गाचा ‘स्’ होऊन त्याचा पुढील वर्णाशी संधी होतो.

उदा. श्रेय: + कर = श्रेयस्कर

सराव प्रश्न –

प्र.1 पुढीलपैकी संधिविग्रह व संधी यातील चुकीचा पर्याय निवडा. (2025)

1) प्रति + ईक्षा = प्रतीक्षा 2) मह + ऋषी = महर्षी

3)स्व + अर्थ = स्वार्थ 4) सह +अनुभूती = सहानुभूती

प्र.2 ‘संगती’ या शब्दाची योग्य संधी फोड कोणती ? (2024)

1) सम् + गती 2) संग् + ती 3)) सग् + गती 4) सन् + गती

प्र. 3 पहिल्या 5 वर्गातील अनुनासिकांखेरीज कोणत्याही व्यंजनापुढे अनुनासिक व्यंजन आले, तर पहिल्या व्यंजनाबद्दल त्याच वर्गातील अनुनासिक येते, या नियमात बसणारा जोडशब्द ओळखा. (2017)

1) जगन्नाथ 2) वाक्पती 3) पुनर्जन्म 4) मन्वंतर

प्र. 4 संधीप्रकारानुसार विसंगत असणारा पर्याय निवडा. (2018)

1) गिरीश 2) प्रत्येक 3) तपोबल 4) धारोष्ण

प्र. 5 पुढीलपैकी पररूप संधी असलेल्या शब्दाचा पर्याय ओळखा. (2021)

1) कितीक 2) केलेसे 3) एकेक 4) नदीत

उत्तरे 1-2 / 2- 1 / 3 – 2 / 4 – 3 / 5 – 3